(२१)

## जाहीर नोटीस

तमाम नागरीकांना या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे पिंपळे सौदागर येथील स.नं. ७० ते ७२, १४४ ते १४६ व १४९ पै. येथील नागरिकांना दक्षिणेकडील बाजुस रस्त्याकडे येण्या –जाण्यासाठी रस्ता नाही. त्यामुळे गोविंद यशदा चौक ते आरक्षण क्र. ३७१ लगत स.नं. ७० ते ७२, १४४ ते १४६ व १४९ पै. विश्वशांती कॉलनी रस्त्यापर्यंत ९.०० मी. रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २०५ नुसार घोषित करणेबाबत मा. ड प्रभाग समिती ठराव क्रं. ३७ दि. ०१/०२/२०१९अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मौजे पिंपळे सौदागर येथील गोविंद यशदा चौक ते आरक्षण क्र. ३७१ लगत स.नं. ७० ते ७२, १४४ ते १४६ व १४९ पै. विश्वशांती कॉलनी रस्त्यापर्यंत ९.०० मी. रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार उक्त ठरावाप्रमाणे घोषित करणेची कार्यवाही करावयाची आहे.

सदर घोषित करावयाच्या रस्त्याचा आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/सूचना असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवासच्या विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/सूचनांवर योग्य तो विचार करून ठरावाप्रमाणे रस्ता घोषीत करणेसाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल.विहीत मुदतीनंतर प्राप्त न झालेल्या कोणत्याही हरकत/सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

आयुक्त<br>
पिंपरी चिंचवड महानगरपालिका<br>
पिंपरी ४११ ०१८

जाहिरात क्र. ३५२

जाहिरात क्र.<br>
दि. २९/६/२०१९